**नियमित फौजदारी केस नं. ५६/२०१५**

**नि. क्र. ९८ लगत**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१  संजय रमेश पिलणकर यांचा पुढील सरतपास, अभियोक्ता श्रीमती एस.आर.वनकर यांचेकडून, शपथेवर सुरु –</u>**

०२. मला आता दाखविणेत आलेला दस्त म्हणजे प्रविण विनायक चव्हाण यांनी दिनांक ०९.०३.२०१४ रोजी केलेला जबाब आहे. त्यावर प्रविण चव्हाण याची स्वाक्षरी आहे. तसेच त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर प्रविण चव्हाण याने सांगितलेप्रमाणेच नमूद केलेला आहे (सदर जबाबास निशाणी देण्याची विनंती सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी केली. आरोपीचे विधीज्ञ यांनी आक्षेप घेतला की, सदरचा जबाब हा पोलीसांनी आरोपीचा नोंदवून घेतलेला जबाब आहे, त्यामुळे केवळ सहीपुरती निशाणी देता येईल. साक्षीदाराने केलेले विधान लक्षात घेता तसेच साक्षीदार कोणत्या जबाबाबाबत सांगत आहे याच्या निश्चितीकरिता, सदर जबाबास निशाणी देता येईल. त्यातील मजकूर या प्रकरणी वाचता येईल किंवा कसे याबाबत प्रकरणात झालेला एकूण पुरावा व अंतिम युक्तीवाद यांवरुन निश्चित करता येईल. सबब, सदर दस्तास **<u>निशाणी ९९</u>** देणेत आली).

०३. प्रविण चव्हाण याने सोबत आणलेली सिंगल बॅरल बंदुक, चार्जिंग बॅटरी व फुटलेला काडतूस हे मी पंचनामा करुन जप्त केले. मला आता दाखविणेत आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. तसेच त्यावर दोन पंचांच्या स्वाक्षरी आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर पंचनाम्याला **<u>निशाणी १००</u>** देणेत आली). मी पंचनामा करुन, सील करुन त्या वस्तू माझ्या ताब्यात घेतल्या. त्यानंतर त्याबाबत मुद्देमाल पावती मी तयार केली. मला आता दाखविणेत आलेली मुद्देमाल पावती तिच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर पावतीला **<u>निशाणी १०१</u>** देणेत आली).

०४. प्रविण चव्हाण याचेसोबतच त्या दिवशी पोलीस ठाण्यात राजेश सदानंद मयेकर व राजा शेख हे दोघे आले होते. आज रोजी प्रविण चव्हाण व राजेश मयेकर हे न्यायालयात हजर आहेत, राजा शेख हजर नाही.

सरतपास पुर्ण.

(आरोपी क्र. १, २ व ४ चे विधीज्ञ श्री. चवंडे हजर आहेत. त्यांनी साक्षीदाराचा उलटतपास सुरू करण्याची तयारी दाखविली. प्रकरणाचे स्वरुप पाहता, या प्रकरणात खरोखरच कलम ३०४–अ भा.दं.वि. अन्वये च्या गुन्हयाबाबत संपरीक्षा पुढे सुरु ठेवावी लागेल की, कलम ३०४ भा.दं.वि. अन्वये अपराध असल्याने प्रकरण सत्र न्यायालयाकडे वर्ग करावे लागेल, याची निश्चिती करणे गरजेचे आहे. त्यासाठी भारतीय साक्षी पुरावा अधिनियम चे कलम १३५ अन्वये प्रस्तूत प्रकरणी अगोदर तपास अधिकारी यांची साक्ष नोंदविणे गरजेचे वाटते. सबब, त्या कलमान्वये या न्यायालयास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराने अगोदर तपास अधिकारी यांची साक्ष नोंदविणेत यावी असे आदेशित करण्यात येते. प्रस्तूत साक्षीदार क्र. १ याचा उलटतपास घेणेचा आरोपींचा अधिकार राखून ठेवला जात आहे.)

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

BALIRAM DATTATRAYA TARE

Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.01.25 16:07:41 +0530

(ब. द. तारे)

दिनांक –२५.०१.२०२३

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

Evidence in RCC no. 56-2015

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Thaware (Jr. Clerk) |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 25/01/2023 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 25/01/2023 |
| Evidence uploaded on | : | 25/01/2023 |